# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे- ४११ ००१

Phone No. - ०२०-२६१२३०६६/६७ Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in


**प्रसिध्दी निवेदन**

जा.क्र.मरापप/NTS/इ.१०वी/२०२०-२१/2652

**परीक्षा प्राधान्य**

दि. 08/१०/२०२०

प्रति,

मा. महासंचालक,
माहिती जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, तळमजला,
मुंबई - ४०० ०३२

**विषय:- राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) २०२०-२१ इ. १० वी साठी राज्यस्तर परीक्षा दि. १३ डिसेंबर, २०२० राष्ट्रीयस्तर परीक्षा दि. १३ जून, २०२१ प्रसिध्दी निवेदनाबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१ यांचेमार्फत राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) इ. १० वी साठी राज्यस्तर परीक्षा रविवार दि. १३ डिसेंबर २०२० रोजी घेण्यात येणार आहे. त्यासंबंधी प्रसिध्दी निवेदनाची प्रत सोबत जोडलेली आहे.

महाराष्ट्रातील प्रज्ञावान विद्यार्थी शोधण्याच्या दृष्टीने या परीक्षेचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. महाराष्ट्रातील सर्व वर्तमानपत्रे, आकाशवाणी व दूरदर्शनवरुन व लोकराज्य मासिकामधून या परीक्षेच्या प्रसिध्दी निवेदनास विनामूल्य प्रसिध्दी देण्यात यावी अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१.

E:\2020-21\NTS Pressnote

**प्रत माहितीस्तव सादरः**

१) मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१.
३) मा. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, आदिवासी विकास भवन, १ ला मजला, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
४) मा. आयुक्त, समाजकल्याण विभाग, ३ चर्च रोड, GPO जवळ, पुणे-१
५) मा. महासंचालक, डॉ. बाबसाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे-१.
६) मा. शिक्षणसंचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, डॉ. ॲनी बेझन्ट मार्ग, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे- ४११ ००१.
७) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे.
८) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य, शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, सदाशिव पेठ, पुणे-३०.
९) मा. शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१.
१०) मा. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, नेताजी सुभाषचंद्र बोस रोड, मुंबई.

**ब) प्रत माहिती व कार्यवाहीस्तव सादरः-**

१) मा. संचालक, दूरदर्शनकेंद्र, वरळी, मुंबई ४०० ०२५ कृपया या निवेदनास त्वरीत प्रसिद्धी देण्यात यावी ही विनंती.
२) मा. संपादक, "शिक्षण संक्रमण" माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजी नगर, पुणे-५ कृपया या निवेदनास प्रसिद्धी देण्याची विनंती आहे.
३) मा. संपादक "जीवन शिक्षण" महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, सदाशिव पेठ, पुणे-३०. कृपया या निवेदनास प्रसिद्धी देण्याची विनंती आहे.
४) मा. संपादक दै. -------------------------- कृपया या निवेदनास आपल्या लोकप्रिय दैनिकातून बातमी स्वरुपात प्रसिद्धी देण्यात यावी ही विनंती.
५) मा. व्यवस्थापक ------------------------------- कृपया या निवेदनास आपल्या लोकप्रिय चॅनलवरुन बातमी स्वरुपात प्रसिद्धी देण्यात यावी ही विनंती.

**क) प्रत माहिती व कार्यवाहीस्तवः-**

१) संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था, रविनगर, नागपूर यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक --------------------------- (सर्व)
३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक सर्व जिल्हा परिषद यांना त्वरीत कार्यवाहीसाठी
४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, -------------------- (सर्व)

# प्रसिध्दी निवेदन

# राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) इ. १० वी साठी २०२०-२१

सन १९६३ पासून राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा योजना ही राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), नवी दिल्ली यांचेमार्फत राबविली जाते. प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या प्रज्ञेची जोपसना करणे हा या योजनेचा गाभा आहे. प्रज्ञावान विद्यार्थ्यांना दरमहा शिष्यवृत्तीच्या स्वरुपात आर्थिक मदत करण्यात येते. मूलभूत विज्ञान, सामाजिक शास्त्र आणि वाणिज्य यामधील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवी प्राप्त करेपर्यंत सदर शिष्यवृत्ती मिळते. अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन आणि विधी यामधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सदर शिष्यवृत्ती फक्त पदव्यूत्तर पदवीपर्यंत देण्यात येते. निवड वर्ष २०१२-१३ पासून राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (NTS) इ. १० वी साठी करण्यात आली आहे.

१) **शिष्यवृत्ती संख्या:-** भारत देशात इ. १० वी या इयत्तेसाठी परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे २००० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या प्रदान करण्यात येतात.

२) **शिष्यवृत्तीची रक्कम:-** राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), नवी दिल्ली यांच्या नियमांच्या अधिन राहून प्रत्येक शिष्यवृत्ती धारकास खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती दिली जाते.

| अ.क्र. | तपशील | दरमहा शिष्यवृत्ती रु. |
|---|---|---|
| १ | शालान्त परीक्षेनंतर + २ स्तरावर दोन वर्ष (इ. ११ वी व इ. १२ वी) | १२५०/- |
| २ | सर्व शाखांच्या प्रथम पदवीपर्यंत (उदा. B.A., B.COM., B.Sc. | २०००/- |
| ३ | सर्व शाखांच्या द्वितीय पदवीपर्यंत (पदव्युत्तर पदवीपर्यंत) | २०००/- |
| ४ | Ph.D. साठी ४ वर्षापर्यंत (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून इतर शाखांसाठी) | विद्यापीठ आयोगाचे नियमानुसार मान्य दराने |

३) **आरक्षण:-** अनुसूचित जातींसाठी (SC) १५% शिष्यवृत्त्या, अनुसूचित जमातींसाठी (ST) ७.५% शिष्यवृत्त्या, सन २०१८-१९ पासून http://www.ncbc.nic.in/user_panel/centralliststateview.aspx या संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या केंद्रीय सूचीनुसार (Non-creamy layer) इतर मागास संवर्गासाठी (OBC) २७% शिष्यवृत्त्या आणि **सन २०१९-२० पासून EWS (Economically Weaker Section) घटकातील विद्यार्थ्यांसाठी १०% शिष्यवृत्त्या राखून ठेवण्यात आलेल्या आहेत.** तसेच दिव्यांगांसाठी ४% आरक्षण प्रत्येक संवर्गात लागू करण्यात आले आहे. (a), (b), and (c) प्रत्येकी १% आरक्षण व (d), (e) या साठी १% आरक्षण प्रत्येक संवर्गात लागू करण्यात आले आहे.

(a) Blindness and low vision : (BLV)

(b) Deaf and hard of hearing : (DH)

(c) Locomotors disability including cerebral palsy, leprosy cured, dwarfism, acid attack victims and muscular dystrophy : (LD)

(d) Autism, intellectual disability, specific learning disability and mental illness : (AID)

(e) Multiple disabilities from amongst persons under clauses (a) to (d) including deaf blindness in the posts identified for each disabilities : (DH)

४) **आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सादर करावयाचे प्रमाणपत्र :-**

a) अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) च्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याचे जातीचे प्रमाणपत्र upload करणे आवश्यक आहे.

b) http://www.ncbc.nic.in/user_panel/centralliststateview.aspx या संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या केंद्रीय सूचीनुसार इतर मागास संवर्ग (OBC) च्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याचे जातीचे व Non-creamy layer प्रमाणपत्र upload करणे आवश्यक आहे.

**c) भारत सरकार यांचे No.३६०३९/१/२०१९-Estt (Res) दि. ३१ जानेवारी २०१९ च्या अधिसूचनेनुसार Economically Weaker Section (EWS) च्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याचे EWS प्रमाणपत्र upload करणे आवश्यक आहे.**

d) दिव्यांग आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याचे दिव्यांग प्रमाणपत्र upload करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे विद्यार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र, EWS प्रमाणपत्र, Non-creamy layer प्रमाणपत्र व दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र परिषदेच्या संकेतस्थळावर शाळा लॉगिन करुन **दि. १० नोव्हेंबर २०२०** पर्यंत ऑनलाईन upload करावयाची आहेत व तसेच सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीची आरक्षणाचा लाभ घेण्यासाठीची आवश्यक प्रमाणपत्रे परीक्षेच्या दिवशी केंद्रसंचालकांकडे जमा करणे बंधनकारक आहे. ज्या विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे विहित मुदतीत ऑनलाईन upload केली जाणार नाहीत तसेच परीक्षेच्या दिवशी केंद्रसंचालकांकडे जमा केली जाणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना सर्वसाधारण संवर्ग (General category) म्हणून गृहीत धरले जाईल व सदर विद्यार्थ्यांना आरक्षणाचा लाभ दिला जाणार नाही. **याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक, संबंधित पालक व विद्यार्थ्यांची असेल. याची नोंद घ्यावी.**

५) **विद्यार्थ्यांची निवड :-** विद्यार्थ्यांची निवड दोन स्तरावर करण्यात येईल.

a) **प्रथमस्तर (राज्यस्तर) :-** संबंधित राज्यस्तर/केंद्रशासित प्रदेशाच्या लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांची निवड राष्ट्रीय स्तरासाठी करण्यात येईल.

b) **द्वितीयस्तर (राष्ट्रीयस्तर):-** प्रथमस्तर (राज्यस्तर) परीक्षेतून यशस्वी झालेले विद्यार्थी द्वितीयस्तर (राष्ट्रीयस्तर) परीक्षेसाठी बसू शकतील. सदर परीक्षा NCERT नवी दिल्ली यांचेमार्फत घेण्यात येते.

६) **पात्रता गुण :-** MAT व SAT विषयासाठी प्रत्येक विषयात स्वतंत्रपणे General संवर्गासाठी ४०% गुण व SC, ST व दिव्यांगासाठी ३२% गुण आवश्यक आहेत.

७) **शुल्क :-** राज्यस्तर परीक्षेसाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यात येते. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), नवी दिल्ली यांचेमार्फत घेण्यात येणाऱ्या द्वितीयस्तर (राष्ट्रीयस्तर) परीक्षेसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | शुल्क | शाळा संलग्नता शुल्क |
|---|---|---|---|---|
| १ | ऑनलाईन नियमित आवेदनपत्रे भरणे | ०८/१०/२०२० ते २५/१०/२०२० | १५०/- | संलग्नता शुल्क रु. २००/- प्रति संस्था प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी |
| २ | ऑनलाईन विलंब आवेदनपत्रे भरणे | २६/१०/२०२० ते ३०/१०/२०२० | २७५/- | |
| ३ | ऑनलाईन अतिविलंब आवेदनपत्रे भरणे | ३१/१०/२०२० ते ०४/११/२०२० | ४००/- | |
| ४ | ऑनलाईन अतिविलंब आवेदनपत्रे भरणे (शाळा/संस्था जबाबदार असेल तर) | ३१/१०/२०२० ते ०४/११/२०२० | ५२५/- | |

८) **परीक्षेच्या तारखा:-**

| परीक्षा स्तर | राज्य / प्रदेश / विभाग | दिनांक |
|---|---|---|
| प्रथमस्तर (राज्यस्तर) परीक्षा | मिझोराम, मेघालय, नागालँड आणि अंदमान व निकोबार बेटे येथील परीक्षेचा दिनांक | शनिवार दि. १२/१२/२०२० |
| | **महाराष्ट्रसह इतर सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश येथील परीक्षेचा दिनांक** ⟹ | **रविवार दि. १३/१२/२०२०** |
| द्वितीयस्तर (राष्ट्रीयस्तर) परीक्षा | सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेश येथील परीक्षा | रविवार दि. १३ जून, २०२१ |

९) **पात्रता :-**

a) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शासनमान्य शाळेतील इयत्ता १० वी मध्ये शिकत असलेल्या नियमित विद्यार्थी/विद्यार्थीनीस राज्यस्तर परीक्षेस बसता येते. त्यासाठी वयाची, उत्पन्नाची अगर किमान गुणांची अट नाही. तसेच कोणतीही पूर्व परीक्षा देण्याची अट नाही.

b) ओपन डीस्टन्स लर्निंग (ODL) स्कूल योजनेखाली नोंदविलेले खालील अटी पूर्ण करणारे विद्यार्थीही या परीक्षेसाठी पात्र ठरतात.

- १ जुलै २०२० रोजी ज्यांचे वय १८ पेक्षा कमी आहे.
- जे नोकरी करीत नाहीत.
- जे इ. १० वी च्या परीक्षेला पहिल्यांदाच बसत आहेत.

१०) **राज्यस्तरीय परीक्षेचे विषय व वेळापत्रक:-** लेखी परीक्षेचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल.

**A) प्रथमस्तर (राज्यस्तर) परीक्षा :-**

| अ.क्र. | विषयाचे नाव | एकूण गुण | एकूण प्रश्न | कालावधी | वेळ | पात्रता गुण (प्रत्येक विषयात किमान) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बौध्दिक क्षमता चाचणी Mental Ability Test | १०० | १०० | १२० मिनिटे (फक्त दृष्टी अपंगांसाठी ३० मिनिटे जादा वेळ) | १०.३० ते १२.३० | ४०% (SC, ST व दिव्यांग ३२%) |
| | | | विश्रांती | | | |
| २ | शालेय क्षमता चाचणी Scholastic Aptitude Test | १०० | १०० | १२० मिनिटे (फक्त दृष्टी अपंगांसाठी ३० मिनिटे जादा वेळ) | १३.३० ते १५.३० | ४०% (SC, ST व दिव्यांग ३२%) |

**अ) पेपर - १ ला :- बौध्दिक क्षमता चाचणी (MAT)**

ही मानसशास्त्रीय चाचणी असून, त्यामध्ये कार्यकारणभाव, विश्लेषण, संकलन इत्यादी संकल्पनांवर आधारित १०० बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न असतील. (एकूण १०० गुण)

**ब) पेपर - २ रा :- शालेय क्षमता चाचणी**

ही सामान्यत: ९ वी व १० वीच्या अभ्यासक्रमांवर आधारित असेल. त्यामध्ये १) सामान्य विज्ञान २) समाजशास्त्र ३) गणित असे तीन विषय असतील. या तीन विषयांचे एकण १०० प्रश्न सोडवायचे असतात.

सामान्य विज्ञान ४० गुण + समाजशास्त्र ४० गुण + गणित व भूमिती २० गुण = एकूण १०० गुण

➢ **उपविषयावर गुणांची विभागणी खालीलप्रमाणे असेल.**

a) सामान्य विज्ञान ४० गुण :- भौतिकशास्त्र १३ गुण, रसायनशास्त्र १३ गुण व जीवशास्त्र १४ गुण.

b) सामाजिक शास्त्र ४० गुण :- इतिहास १६ गुण, राज्यशास्त्र ०८ गुण व भूगोल १६ गुण.

c) गणित २० गुण :- बिजगणित १० गुण व भूमिती १० गुण.

**B) द्वित्तीय (राष्ट्रीयस्तर) परीक्षा :-** राज्यस्तर परीक्षेतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीयस्तर परीक्षेबाबत NCERT नवी दिल्ली यांचेमार्फत परस्पर कळविले जाईल.

११) **अर्ज करण्याची पध्दत:-** ऑनलाईन आवेदनपत्र भरताना विद्यार्थ्याच्या जातीचे प्रमाणपत्र, केंद्रीय सूचीनुसार इतर मागास संवर्गातील (OBC) विद्यार्थ्यांची Non-creamy layer प्रमाणपत्र, EWS (Economically Weaker Section) प्रमाणपत्र व दिव्यांगत्व प्रमाणपत्राची खात्री करुनच जात व दिव्यांगत्वाची माहिती भरावी. मुख्याध्यापक व विद्यार्थ्याचा पासपोर्ट साईज फोटो व स्वाक्षरी ऑनलाईन आवेदनपत्र भरताना स्कॅन (Scan) करुन अपलोड करणे आवश्यक आहे. अपूर्ण भरलेले आवेदनपत्रे संगणक स्विकृत करणार नाही. **तसेच ऑनलाईन भरलेल्या विद्यार्थ्याच्या आवेदनपत्रात काही दुरुस्ती असल्यास सदरची दुरुस्ती दि. १० नोव्हेंबर २०२० पर्यंत करता येईल. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची असेल.** सविस्तर माहिती परिषदेच्या www.mscepune.in व http://nts.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

१२) **राज्याचा राष्ट्रीयस्तर परीक्षेसाठी कोटा:-** द्वितीयस्तर (राष्ट्रीयस्तर) परीक्षेसाठी प्रत्येक राज्याच्या प्रथमस्तर (राज्यस्तर) परीक्षेतून गुणानुक्रमे निवड करावयाची विद्यार्थी संख्या ठरवून देण्यात आली आहे. गत वर्षी महाराष्ट्रासाठी हा कोटा ७७४ विद्यार्थी संख्या इतका होता. द्वितीयस्तर (राष्ट्रीयस्तर) परीक्षेतून अंतिम शिष्यवृत्तीधारक निवडताना राज्य/केंद्रशासित प्रदेश यांचा हिस्सा (कोटा) ठेवण्यात आलेला नाही.

१३) **निकाल घोषित करणे :-** प्रथमस्तर (राज्यस्तर) परीक्षेचा निकाल साधारण जानेवारी २०२० च्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल. सदर परीक्षेचा निकाल व निवडयादी फक्त परिषदेच्या संकेतस्थळावरच उपलब्ध केली जाईल. जिल्ह्यांनी, शाळांनी व विद्यार्थ्यांनी सदरचा निकाल परिषदेच्या संकेतस्थळावरुनच प्राप्त करुन घ्यावयाचा आहे.

१४) **परदेशात शिकणारे भारतीय विद्यार्थी :-** परदेशात शिकणारे भारतीय विद्यार्थी इ. १० वी व समकक्ष इयत्तेत शिकत असतील तर प्रथमस्तर (राज्यस्तर) परीक्षेला न बसता थेट द्वितीयस्तर (राष्ट्रीयस्तर) परीक्षेस बसू शकतात. त्यासाठी विद्यार्थ्याने NCERT नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध माहितीप्रमाणे आवश्यक पत्रव्यवहार करुन संगणकावरुन घेतलेले आवेदनपत्र सादर करावे. सदर आवेदनपत्रासोबत त्याच्या मागील वर्षीच्या गुणपत्राची सत्यप्रत जोडून ते दि. ३१ डिसेंबर २०२० पूर्वी NCERT नवी दिल्ली यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

१५) **अनधिकृततेबाबत इशारा :-** NCERT नवी दिल्ली / महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे शिवाय अन्य कोणत्याही संस्थेस या प्रकारची परीक्षा किंवा पूर्व परीक्षा घेणे, प्रमाणपत्र देणे, शिष्यवृत्ती देणे या करिता महाराष्ट्रात प्राधिकृत करण्यात आलेले नाही. अशा संस्थाबाबतची कोणतीही जबाबदारी NCERT नवी दिल्ली / महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेवर राहणार नाही.

(तुकाराम सुपे)
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१.

E:\2020-21\NTS Pressnote